THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 7TH NOVEMBER 1895.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

### सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा सुधारण्यांबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरावेण्यांत येत आहे:—

१. (१) सदरहू कायद्याच्या २६९ व्या कलमाच्या पहिल्या वाक्यांत "स्थानिक सरकाराला" या शब्दांनंतर "गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वीं मंजुरी घेऊन व" हे शब्द, आणि "आणि तसेंच" या शब्दांनंतर "सदरहू प्रकारच्या मंजुरीनें" हे शब्द दाखल केले पाहिजेत. सन १८८२ चा आक्ट १०, याच्या २६९ व्या कलमाची सुधारणा.

(२) त्याच कलमाच्या पहिल्या वाक्यानंतर खालील मजकूर दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:—

"तसेंच स्थानिक सरकाराला, सदरहू प्रकारचा हुकूम करून, ज्या कोणत्याही जिल्ह्यांत ज्या कोणत्याही अपराधाचा इन्साफ जूरीकडून झाला पाहिजे असें असेल तशा जिल्ह्याच्या बाबतींत, त्या अपराधाचा इन्साफ, स्पेशल जूरीच्या यादींतून समन्स करून बोलाविलेल्या जूररांकडून व्हावा असें जज्ज, त्यास अर्जी केल्यावरून किंवा आपण होऊन फर्मावील, तर त्याप्रमाणें तो इन्साफ झाला पाहिजे, असें ठरविण्याचा, आणि सदरहू हुकूम रद्द करण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा अधिकार आहे."

२. सदरहू कायद्याच्या २७६ व्या कलमांतील "तिसऱ्यानें" या शब्दापूर्वींचा "आणि" हा शब्द रद्द केला पाहिजे, आणि त्याच कलमाच्या शेवटीं खालील मजकूर जास्त दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें:— सन १८८२ चा आक्ट १०, याच्या २७६ व्या कलमाची सुधारणा.

"आणि

**चवथ्यानें**, विवक्षित अपराधांचा इन्साफ स्पेशल जूरीकडून होण्याविषयीं मोकळीक आहे असें ज्या कोणत्याही जिल्ह्याबद्दल स्थानिक सरकारानें ठरविलें असेल त्या जिल्ह्यांत, कलम ३२९ अ यांत सांगितलेल्या स्पेशल जूरीच्या यादींतून जूरर पसंत केले

पाहिजेत असें जज्ज ज्या कोणत्याही खटल्यांत फर्मावील त्या खटल्यांत ते त्याप्रमाणें पसंत केले पाहिजेत."

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३०३ त्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

३. सदरहू कायद्याचें कलम ३०३ याच्याबदला खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेप्रमाणें:—

प्रत्येक चार्जाबद्दल सामान्य ठराव सांगणें. तथापि, घडलेल्या गोष्टीच्या तकरारींबाबद विशेष ठराव मागण्याचा व जूरीस सवाल विचारण्याचा अधिकार आहे.

"३०३. (१) या कलमांत इतर रीतीनें ठरविलें आहे तें खेरीज करून इतर प्रसंगीं, आरोपिताचा इन्साफ ज्या चार्जावरून झाला असेल त्यावर अथवा एकाहून अधिक चार्ज असल्यास त्या प्रत्येकावर 'अपराध केला आहे' किंवा 'अपराध केला नाहीं' असा सामान्य ठराव सांगण्याची जूरीस मोकळीक आहे; आणि जज्जानें तिला त्याप्रमाणें फर्माविलें पाहिजे.

(२) कोणत्याही चार्जाबद्दल सामान्य ठराव सांगण्याविषयीं जूरीस फर्माविण्याच्याबदला जज्जास, त्याची इच्छा असेल त्याप्रमाणें, घडलेल्या गोष्टीच्या कोणत्याही विशेष तकरारींबाबदचे निरनिराळे ठराव मिळून एक विशेष ठराव सांगण्याविषयीं तिला फर्माविण्याचा अधिकार आहे, आणि मग त्यानें, त्या चार्जावर, किंवा अशा ठरावांचा एकाहून अधिक चार्जांशीं संबंध असल्यास अशा चार्जांपैकीं प्रत्येकावर, जूरीनें अशा ठरावांप्रमाणें आरोपितास अपराधी ठरविल्याची किंवा निरपराधी ठरविल्याची नोंद करावी याचा निर्णय केला पाहिजे.

(३) जूरीनें सामान्य ठराव सांगितल्यानंतर, तो ठराव कबूल करावा किंवा नाकबूल करावा या गोष्टीविषयीं जज्जास संशय येईल तर त्याला, असा ठराव झाला असतांही, घडलेल्या गोष्टीच्या ज्या कोणत्याही तकरारीविषयीं किंवा तकरारींविषयीं जूरीचा अभिप्राय कळण्याची आपली इच्छा असेल त्या तकरारीबाबद किंवा तकरारींबाबद आणखी विशेष ठराव सांगण्याविषयीं जूरीस फर्माविण्याचा अधिकार आहे, आणि असा विशेष ठराव मिळाल्यानंतर त्यानें, जूरीचा सदरहू सामान्य ठराव कबूल करणें किंवा न करणें याविषयीं अखेरचा निर्णय केला पाहिजे.

(४) पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) याच्या ठरावांअन्वयें विशेष ठराव सांगितल्यानंतर, जर जज्जास, तो ठराव कबूल करावा किंवा नाकबूल करावा या गोष्टीचा किंवा असा ठराव अपराध केला नसल्याच्या किंवा केला असल्याच्या शाबितीचा ठराव समजावा या गोष्टीचा आपणास निर्णय करतां येण्यासाठीं घडलेल्या गोष्टीच्या कोणत्याही विशेष तकरारींबाबद कोणतीही जास्त माहिती पाहिजे असेल, तर घडलेल्या गोष्टीच्या अशा तकरारींबाबद आणखी विशेष ठराव सांगण्याविषयीं जूरीस फर्माविण्याचा त्यास अधिकार आहे, आणि असा जादा ठराव मिळाल्यानंतर त्यानें, प्रसंगाप्रमाणें, जूरीशीं कबुली किंवा नाकबुली प्रदर्शित करावी याविषयीं किंवा तो जूरीचा ठराव अपराध केला नसल्याच्या किंवा केला असल्याच्या शाबितीचा ठराव ह्मणून नोंदावा याविषयीं अखेरचा निर्णय केला पाहिजे.

(५) सदरील बाबतींपैकीं कोणत्याही बाबतींत, जूरीनें सांगितलेल्या ठरावाच्या अर्थाविषयीं जज्जास संशय येईल तर, तिचा ठराव काय आहे याचा निश्चय करण्यास जरूर असतील तसे सवाल तीस विचारण्याचा त्याला अधिकार आहे, मात्र त्यानें तिनें कोणत्याही ठरावाबद्दलचीं कारणें किंवा तिनें कोणत्याही विशेष साक्षीदारावर भरंवसा ठेवला आहे किंवा नाहीं तें तीस कोणत्याही बाबतींत विचारतां कामा नये.

सदरहू प्रकारचा प्रत्येक सवाल व त्याचा जबाब लिहून ठेविला पाहिजे."

सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३०७ व्या कलमाची सुधारणा.

४. (१) सदरहू कायद्याच्या ३०७ व्या कलमांत "इतकें अगदीं भिन्न असेल कीं इन्साफ बरोबर होण्यासाठीं तें खटलें हें कोर्टाकडे पाठविणें अवश्य आहे असें त्या जज्जास"

या शब्दांच्याबदला "भिन्न असेल व इनसाफ बरोबर होण्यासाठीं तें खटलें हैं कोर्टाकडे पाठविणें अवश्य आहे असें त्या जज्जास स्पष्टपणें" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

(२) त्याच कलमांत "परंतु तयार केलेल्या व जूरीपुढें ठेवलेल्या चार्जावरून ज्या अपराधाची शाबिती आरोपितावर जूरी करूं शकती, तो अपराध त्यानें केला नाहीं किंवा तो अपराध त्यावर शाबित झाला असा ठराव करण्याचा अधिकार हैं कोर्टास आहे;" या शब्दांच्याबदला "आणि तयार केलेल्या व जूरीपुढें ठेवलेल्या चार्जावरून ज्या अपराधाची शाबिती आरोपितावर जूरी करूं शकती, तो अपराध त्यानें केला नाहीं किंवा तो अपराध त्यावर शाबीत झाला असा ठराव, सदरहू कोर्टानें सदरहू अधिकारास पात्र राहून, आणि दरोबस्त पुराव्याचा विचार करून व सेशन-जजाच्या आणि जूरीच्या मतांकडे योग्य लक्ष पुरवून, केला पाहिजे;" हे शब्द दाखल केले पाहिजेत.

५. सदरहू कायद्याच्या ३१९ व्या कलमांत "त्या जिल्ह्यांत" या शब्दांनंतर खालील शब्द दाखल केले पाहिजेत. ते येणेंप्रमाणें:— सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३१९ व्या कलमाची सुधारणा.

"किंवा स्थानिक सरकारानें स्थानिक हकिकतीचा विचार करून या बाबतींत इतर कोणताही प्रदेश नेमलेला असल्यास, याप्रमाणें नेमलेल्या प्रदेशांत."

६. सदरहू कायद्याच्या ३२५ व्या कलमानंतर खालील कलम दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें:— सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३२५ व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

स्पेशल जूररांची यादी तयार करणें.

"३२५ अ. ज्या कोणत्याही जिल्ह्याबद्दल स्थानिक सरकारानें, विवक्षित अपराधांचा इनसाफ, जज्ज तसें फर्मावील तर, स्पेशल जूरीकडून झाला पाहिजे असें ठरविलें असेल, त्या जिल्ह्याच्या बाबतींत, सेशन-जज्जानें, व त्या जिल्ह्याच्या कलेक्टरानें किंवा सदरहू दुसऱ्या अमलदारानें, यांत पूर्वी सांगितलेल्या तपासलेल्या यादीखेरीज आणखी, अशा तपासलेल्या यादींत ज्या जूररांचीं नांवें दाखल केलेलीं असून जे मिळकतीच्या, लौकिकाच्या किंवा शिक्षणाच्या संबंधानें विशेष लायक असल्याकारणानें अशा सेशन-जज्जाच्या व कलेक्टराच्या किंवा सदरहू दुसऱ्या अमलदाराच्या मतें, स्पेशल जूररांचें काम करण्यास योग्य असतील तशा जूररांचीं नांवें दाखल करून एक स्पेशल यादी तयार केली पाहिजे: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं अशा स्पेशल यादींत कोणत्याही मनुष्याचें नांव दाखल केल्यानें, तपासलेल्या यादींतून त्याचें नांव काढतां येतें व तसेंच स्पेशल जूरीकडून इनसाफ न होणाऱ्या खटल्यांमध्यें साधारण जूरराप्रमाणें कानू करण्याच्या त्याच्या पात्रतेपासून तो मुक्त होतो, असें कधींच समजूं नये."

७. सदरहू कायद्याच्या ३२६ व्या कलमांत "सदरहू तपासलेल्या यादींतील" या शब्दांनंतर "किंवा सदरहू स्पेशल यादींतील" हे शब्द दाखल केले पाहिजेत, आणि "तपासलेल्या यादींतील मनुष्यांपैकीं" हे शब्द गाळले पाहिजेत. सन १८८२ चा आक्ट १०, याच्या ३२६ व्या कलमाची सुधारणा.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

ह्या मसुद्याचा उद्देश, सन १८९४ सालच्या जूरी कमिशननें केलेल्या शिफारशींपैकीं ज्या हिंदुस्थान सरकार व मलिका माआझमांचे स्टेट सेक्रेटरी यांनीं पसंत केल्या आहेत त्या अमलांत आणाव्या, हा आहे.

२. मसुद्याचें कलम १, पोट-कलम (१) यावरून सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचें २६९ वें कलम सुधारून असें ठरविण्याचें योजिलें आहे कीं, जूरीनें इनसाफ करण्याच्या पद्धतीची व्याप्ति त्या कलमाअन्वयें वाढविण्याचो किंवा कमी करण्याची स्थानिक सरकारची इच्छा असेल तेव्हां गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी घेतली पाहिजे.

३. अमुक जिल्ह्यांमध्यें स्पेशल जूरीच्या यादी तयार केल्या पाहिजेत असें आणि सेशन-जज्ज, त्याला अर्जी केल्यावरून किंवा आपण होऊन, जूरीनें इनसाफ करण्याजोग्या कोणत्याही खटल्यांत स्पेशल जूररांची योजना करण्या

विषयीं फर्मावील तर तसें केलें पाहिजे असें ठरविण्याचा स्थानिक सरकारास अधिकार देण्याकरितां, कलम १, पोट-कलम (२), २, ६ व ७ यांवरून सदरहू कायद्यांत जरूरीच्या सुधारणा योजिल्या आहेत. या संबंधानें असें ठरविलें आहे कीं अशा स्पेशल यादींमध्यें दाखल करावयाचे जूरर साधारण जूरींच्या यादींमधून विशेष लायकीच्या कारणानें निवडून घेतलेलीं मनुष्यें असलीं पाहिजेत, आणि तसेंच स्पेशल जूरराच्या नात्यानें केलेलें काम केवळ साधारण जूरींत केलेल्या कामाप्रमाणें मानण्यांत येईल व त्याच्या योगानें कोणत्याच जूररास त्याच्या पाळीप्रमाणें साधारण जूररांबरोबर काम करण्याची माफी मिळण्याचा हक्क नाहीं असेंही ठरविलें आहे.

४. मसुद्याच्या ५ व्या कलमावरून सदरहू कायद्याच्या ३१९ व्या कलमांत कांहीं जास्त मजकूर दाखल केलेला असून त्याचा उद्देश, जूररांस किंवा असेसरांस "ते ज्या जिल्ह्यांत राहत असतील" त्याखेरीज इतर प्रदेशांतून समन्स करून बोलाविण्याचा अधिकार आहे असें, जरूर असेल तेव्हां, ठरविण्याचा स्थानिक सरकारास अधिकार द्यावा, हा आहे.

५. कोणताही अपराध केला असल्यास त्याबाबद जूरीला योग्य ठराव सांगतां येण्यासाठीं पुष्कळ प्रसंगीं ज्या अनेक अगत्याच्या गोष्टी जूरीनें विचारांत घेतल्या पाहिजेत त्या तिच्या मनांत आणून देण्यामध्यें सेशन-जज्जांच्या अनुभवास येणारी अडचण ध्यानीं आणून, मसुद्याच्या ३ ऱ्या कलमावरून सदरहू कोडाचें कलम ३०३ हें सुधारून त्याच्यायोगें जज्जास, जूरीनें ठराव सांगितल्यापूर्वी किंवा नंतर, किंवा या दोन्हीवेळीं, घडलेल्या गोष्टीचे जे कोणतेही मुद्दे त्यास अगत्याचे वाटतील त्यांबाबद निरनिराळे ठराव सांगण्याविषयीं जूरीस फर्माविण्याचा अधिकार दिला आहे.

६. सेशन-जज्जास जूरीचा ठराव कबूल नसेल त्या बाबतींमध्यें त्याचीं व हैकोर्टाचीं कामें कोणकोणतीं हें विशेष स्पष्टपणें ठरविण्याकरितां मसुद्याच्या ४ थ्या कलमावरून सदरहू कायद्याच्या ३०७ व्या कलमाची सुधारणा करण्याचें योजिलें आहे.

ए. ई. मिलर.

तारीख १२ माहे आगस्ट सन १८९५

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.